VOL. 7 | ISSUE 1 | FEBRUARY 2021

ISSN: 2454-5503

IMPACT FACTOR : 4.197 (IIJIF)

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

A Peer Reviewed Bimonthly International Journal

Special Issue on

## GENDER EQUITY IN HIGHER EDUCATION

**(Book II)**



**Chief Editor**

**Dr. R. S. Funne**

*(Principal)*

*Issue Editors*

**Dr.S.T.Samale | Dr.S.G.Rathod**

## अनुक्रमणिका

१. महिला सक्षमिकरण व शासनाच्या योजना
**प्राचार्य डॉ. राम फुन्ने | ०८**

२. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतातील स्त्रियांच्या दृष्टीकोणातून मांडलेला ....
**चोपडे विनायक भगवानराव, / प्रा. डॉ. साहेब राठोड | १३**

३. संत कवयित्रींच्या कवितेतून आलेले स्त्री जीवनाचे चित्रण
**प्रा.डॉ.गणपती जोतीबा मोरे | १६**

४. 'महिला सबलीकरण आणि सामाजिक संस्कृती यांच्या सहसबंधाचे अध्ययन'
**प्रा.डॉ.मारोती मोतीराव बामणे | २०**

५. लिंग समानता : महिलांचे आर्थिक सबलीकरण
**डॉ.सुरेश सामाले | २४**

६. भारतीय उच्च शिक्षणातील स्त्रियांचे स्थान
**प्रा. गुरुदेव गांगुर्डे | ३०**

७. महिला सक्षमिकरण ऐतिहासीक दृष्टीकोन
**डॉ.हनुमान मुसळे | ३४**

८. महिलांच्या बदलत्या राजकीय विकासात ७३ व्या घटनादुरुस्तीचे महत्व:
**फुन्ने नारायण सखाराम | ४०**

९. महिला सबलीकरणाकरिता स्वातंत्र्योत्तर काळात झालेले प्रयत्न एक आढावा
**सचिन प्रकाशराव देशमुख / विश्वास दामोदर तळेकर | ४५**

१०. वारकरी संप्रदायतील संत कवयित्रींचे योगदान
**डॉ. भारत विठ्ठलराव शिंदे | ४९**

११. नोकरी करणाऱ्या महिलांच्या बदलत्या भूमिका आणि समस्या
**प्रा.डॉ.सुनिता आत्माराम टेंगसे | ५६**

१२. महिला सक्षमीकरण आणि शासकिय धोरणे
**प्रा.डॉ.विद्या खंडारे-गोवंदे | ६४**

१३. फ. म. शहाजिंदे यांच्या साहित्यातील स्त्रीचित्रण
**प्रा. डिगोळे बालाजी विठ्ठलराव | ६९**

१४. 'संत कवयित्रींच्या अभंगांतून अभिव्यक्त झालेले महिला सशक्तीकरणाचे....
**प्रा.गणेश शिवाजी मारेवाड | ७५**

१५. ग्रामगीतेतील लिंगभाव : एक अभ्यास
**प्रल्हाद दत्तराव भोपे | ८०**

१६. भारतीय राजकारण आणि महिला
**डॉ.हरी गंगाधर काळे | ८८**

१७. स्वयंसहाय्यता बचत गटाचा इतिहास आणि ग्रामीण स्त्रियांचे सक्षमीकरण
**प्रा. डॉ. सुरेश वि. धनवडे | ९२**

**17.**

# 'स्वयंसहाय्यता बचत गटाचा इतिहास आणि ग्रामीण स्त्रियांचे सक्षमीकरण'

**प्रा. डॉ. सुरेश वि. धनवडे**
सहयोगी प्राध्यापक व समाजशास्त्र विभाग प्रमुख,
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय शंकरनगर, ता. बिलोली जि. नांदेड.

**सारांश (Abstract):** प्रत्येक वेळी नशीब मदत करेल अशा गैरसमजात न राहता स्त्रियांनी आर्थिक सक्षमीकरणासाठी संधी शोधने आवश्यक आहे. गावागावांतील बचतगट हे महिलांना आर्थिकदृष्ट्या सबल बनण्यासाठी उत्तम संधी आहेत. रोजगार आणि आत्मसंन्मान या दोन्ही चांगल्या गोष्टी बचत गटाच्या माध्यमातून एखादी स्त्री कमावू शकते. महिला बचत गट ही केवळ कागदावरची शासकीय योजना नसून महिला सबलीकरण, सक्षमीकरण आणि सशक्तीकरणाची एक सुप्त क्रांतीकारी चळवळ आहे. स्वयंसहाय्यता बचत गटामूळे कित्येक स्त्रियांना आत्मसन्मान मिळाला आहे.
**सूचनक भाब्द (keywords):** भारतीय समाज, नागरी स्त्री, ग्रामीण स्त्री, सक्षमीकरण, स्वयंसहाय्यता, बचत गट, बचत गटाचा इतिहास, सबलीकरण, सशक्तीकरण इत्यादी.

**प्रस्तावना:** बचत गट या संकल्पनेचा उगम झाला तो बांगलादेशामध्ये, बचत गटाच्या माध्यमातून सर्वसामान्य गरीब महिलांच्या जीवनात क्रांती घडवून आणणारे नोबेल आणि रॅमन मॅगसेस पुरस्कार विजेते डॉ. मोहम्मद युनूस हे या संकल्पनेचे आणि पर्यायाने चळवळीचे ते 'जनक' आहेत. जोब्रा या खेडेगावात फिरतांना बांबूच्या वस्तू करणाऱ्या कारागीर महिलांची बिकट आर्थिक परिस्थिती पाहून त्यांना छोट्या रकमेची कर्जे द्यायला युनूस यांनी सुरुवात केली. त्यांची परतफेड झाल्यानंतर नव्याने कर्ज देताना कर्जपुरवठ्याचा हा उपक्रम सातत्यानं सुरु राहावा आणि महिलाना गरजेनुसार व्यवहार करणं सोप जावं म्हणून महिलांना एकत्र येवून गट सुरु करायचा आणि गटाव्दारे अंतर्गत कर्जवाटपाची पध्दती प्रत्यक्षात आणायची अशी कल्पना होती. बचत या मूलभूत गोष्टीव्दारे सुरु झालेल्या या गटांना बचत गट असं नाव पडलं. एक ऑक्टोबर 1983 रोजी ग्रामीण बॅंकेची स्थापना करुन डॉ. युनूस यांनी अशा कोट्यावधी महिलांच्या लहानसहान कर्जाचा आणि अर्थपुरवठ्याचा प्रश्न सोडविला. त्यामुळे बांगलादेशामधील सर्वसामान्य महिलांच्या आणि पर्यायाने त्यांच्या कौटुंबिक जीवनात क्रांती घडून आली. मात्र महिलांकडून केल्या जाणाऱ्या कर्जाच्या परतफेडीचे प्रमाणही लक्षणीय होते. त्यामुळे ग्रामीण बॅंकेच्या प्रारुपला

(मॉडेल) जगभर प्रसिध्दी मिळाली. स्वयंसहाय्यता बचत गटाचा व महिला सक्षमीकरणाचा अभ्यास देश व विदेशातील अभ्यासकांनी विविधांगी संशोधनपर अध्यन केले असले तरी, उपरोक्त विषयास अनुसरुन व विषयास अधिक समर्पक अशाच घटनांचा आढावा प्रस्तूत शोध निबंधात घेतला आहे.

याच अनुषंगाने उपर्युक्त शिर्षकावरुन पुढील उद्दिष्टांना अनुसरुन केले आहे.

1. ग्रामीण समाजातील 'बचत गट' आणि 'स्त्री सक्षमीकरण' समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अध्ययन करणे.
2. 'बचत गट ' आणि 'ग्रामीण स्त्री' यामधील परस्पर संबंध जाणून घेणे.
3. संशोधनाव्दारे 'ग्रामीण स्त्री सक्षमीकरण' या संकल्पनेचे अध्ययन करणे.
4. उत्तर आधुनिकतेत 'स्वयंसहाय्यता बचत गटाचे' आणि 'ग्रामीण स्त्रियांचे सक्षमीकरणाचे' महत्व जाणणे.
5. संकलित माहितीचे विश्लेषण करणे.

संशोधनाची उद्दिष्टे समोर ठेवून अध्ययनात गृहितकृत्ये पुढीलप्रमाणे मांडलेली आहेत.

1. 'स्वयंसहाय्यता बचत गटामुळे ग्रामीण' स्त्रियांची उन्नती होते.
2. 'स्वयंसहाय्यता बचत गटामुळे' स्त्रियांची आर्थिक उन्नती होते.
3. 'स्वयंसहाय्यता बचत गटामुळे स्त्री सक्षमीकरणाची' एक सुप्त क्रांतीकारी चळवळ आहे.

**भोधनिबंधाचे महत्वः** प्रस्तुत शोध निबंधाचे मुख्य उद्दिष्ट 'बचत गट' आणि 'स्त्री सक्षमीकरणाचे' समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अध्ययन करणे. उत्तर आधुनिकतेत बचत गटाचे आणि ग्रामीण स्त्रियांचे महत्व जाणणे. त्यावरील उपाययोजनांची अंमलबजावणी करणे आणि लोकशाहीतील स्वातंत्र्याची फळे कशी उपभोगता येईल व सबंध स्त्री समाजाचा विकास कसा होईल? याकडे लक्ष केंद्रीत असले पाहिजे. भारतीय समाजातील एक घटक म्हणून आपल्याला अभ्यासाद्वारे लक्षात येते की, सदरील अभ्यासाचा उपयोग सामान्य अभ्यासक, शासन यंत्रणा, स्त्री अभ्यासक, परिवर्तनवादी चळवळीतील कार्यकर्ते इत्यादींना होऊ शकेल.

**संशोधन पध्दती :** प्रस्तुत शोधनिबंधासाठी वर्णनात्मक संशोधन आराखडा वापरण्यात आला आहे. तसेच शोधनिबंधात दुय्यम स्त्रोतांचा उपयोग, नियतकालीके, शासकीय लेख, वर्तमानपत्रे, वैचारीक लेख, संकेत स्थळे इत्यादींचा वापर करण्यात आला आहे. या अनुषंगाने दुय्यम सामुग्री पध्दतीव्दारे बचत गटाचा इतिहास आणि ग्रामीण स्त्रियांचे सक्षमीकरण ही

संकल्पना नविन जरी वाटत असली तरी ती जुनी आहे. प्रस्तुत शोधनिबंधाचे वस्तुनिष्ठ विश्लेषण खालीलप्रमाणे केले आहे.

**बचत गटाचा इतिहासः** भारतासारख्या विकसनशिल देशात सातत्याने वाढणाऱ्या लोकसंख्या बरोबरच, बेरोजगारी, दारिद्र्य, उपासमार इत्यादी दुष्टचक्राचा मुकाबला करावा लागत आहे. आजघडीला भारतामध्ये दारिद्र्यरेषेखाली जीवन जगणाऱ्या लोकांचे प्रमाण पुष्कळ आहे. अशा दारिद्र्यात जीवन जगत असणाऱ्या लोकांना वाईट परिस्थितीतून बाहेर काढणारे, आर्थिकदृष्ट्या दूर्बल घटकांचे आर्थिक सबलीकरण करणारे व महिलांचे आर्थिक स्वावलंबन करणारे अतिशय महत्वाचे साधन म्हणून 'स्वयंसहाय्यता बचत' गटांकडे पाहिले जाते. अशा बचत गटामूळे महिलांचे आर्थिक सबलीकरणाबरोबरच त्यांचे सामाजिकस्थान, प्रतिष्ठा उंचावण्यास मदत होत आहे. विश्वविख्यात अर्थतज्ञ डॉ. मोहम्मद युनूस यांनी आर्थिकदृष्ट्या दूर्बल घटकांची सावकारी पाशातून मुक्तता व्हावी व अशा लोकांना स्वयंरोजगाराचे कायमचे साधन प्राप्त व्हावे या उद्देशाने लोकांना एकत्रित करुन त्यांचे लहान लहान गट करुन त्यांना व्यवसायासाठी लघू कर्ज दिले जाते. अशा कार्यातून डॉ. मोहम्मद युनूस यांनी बांगलादेशात स्वयंसहाय्यता बचत गटाची स्थापना केली. आज हेच कार्य भारतसारख्या अनेक विकसनशिल देशात मोठ्या प्रमाणात विस्तार होत आहे.

भारतात 1999 पासून खऱ्या अर्थाने बचत गट उभारणीला चालना मिळाली. महाराष्ट्रात 1994 मध्ये सर्वंकष महिला धोरण जाहीर करण्यात आले. ग्रामीण विकासात महिलांचा सहभाग वाढविण्यासाठी आणि पर्यायाने महिला सक्षमीकरणासाठी या धोरणात 'बचत गट' संकल्पनेला महत्त्व देण्यात आले होते; मात्र बचत गटांची ही संकल्पना महाराष्ट्राला सर्वस्वी नवीन नव्हती. 'बचत गट' उभारणीचा वेग आणि प्रमाण खूप मोठं आहे; मात्र मध्यंतरीच्या काळात ही संख्यात्मक वाढ झाली, तितक्या वेगानं गुणात्मक वाढ झाली नाही. याचं कारण 'बचत गट' या संकल्पनेचा नेमका अर्थ आणि त्याची व्याप्ती सदस्य महिलांना नेमकेपणानं सांगितली गेली नाही. त्यामुळे लहानसहान गरजा भागविण्यासाठी कधीही कर्ज उपलब्ध करुन देणारा उपक्रम म्हणूनच त्याकडे पाहिलं गेलं, मात्र त्यानंतर महिलांच्या उद्यमशीलतेला वाव मिळेल अशा प्रकारचं प्रशिक्षण देण्यास सुरुवात झाली. सरकारी पातळीवर, तसेच अनेक स्वयंसेवी संस्थांनीही अशा प्रशिक्षणाची विशेष व्यवस्था केली. त्यातून नंतर विविध उद्योगव्यवसाय करणाऱ्या बचतगटांची संख्या वाढली.[1]

स्वयंसहाय्यता बचत गटाची चळवळ ही आर्थिक प्रश्नांची सोडवणूक करणारी आहे. स्वंयसहाय्यता बचत गटाव्दारे ग्राम पातळीवर विविधप्रकारचे सामाजिक कार्य केली जात आहे. त्यामुळे आर्थिक व सामाजिक

विकासाच्या दृष्टिकोनातून स्वयंसहाय्यता गटाची महत्वपूर्ण भूमिका आहे. *''प्रादेशिक समानता असलेल्या समविचारी, समान गरजा व समान सामाजिक व आर्थिक स्तरामधील 10 ते 20 महिलांनी स्वयंबचत करुन बचतीचा विनियोग उपभोगासाठी करुन कर्ज घेऊन व्यवसाय करणाऱ्या व लोकशाही मार्गाने संघटन करणाऱ्या समुहास स्वयंसहाय्यता बचत गट म्हणतात.''*[2]

**स्त्री सक्षमीकरण:** ''कायदे व कल्याण कार्यक्रमाच्या माध्यमातून आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व राजकीय सर्व क्षेत्रामध्ये महिलांना पुरुषांच्या बरोबरीने हक्क व दर्जा प्रदान करुन देणे. विकासासाठी संधी उपलब्ध करुन देणे, आणि स्त्री–पुरुष असमानता नष्ट करणे या प्रक्रियेला स्त्री सक्षमीकरण असे म्हणतात.''[3]

**ग्रामीण स्त्री सक्षमीकरण:** ग्रामीण भारतातील बहुसंख्य स्त्रिया या घरकामात गुंतलेल्या असतात. कमी उत्पादकेची व कमी कौशल्याची कामे स्त्रियांकडे दिली जातात. म्हणून स्त्रियांना आर्थिक क्षेत्रात दुय्यम स्थान दिले जाते. महिलांचे आर्थिकदृष्ट्या सबलीकरण होण्याचे प्रमाण व वेग कमी आहे. महिला या उपजीविकेसाठी शेती, मजुरी, दुग्ध व्यवसाय इत्यादी क्षेत्रात काम करत असतात परंतु त्या कामाची कधीच मोजमाप करत नाही.

महाराष्ट्र शासनाने 1994 मध्ये पहिले महिला धोरण जाहिर केले. त्यात कालसुसंगत बदल करत 2001 मध्ये दुसरे तर 2014 मध्ये तिसरे महिला धोरण निश्चित केले गेले. या सर्व धोरणांमध्ये प्रामुख्याने स्त्रियांवरील अत्याचार, हिंसा, सत्रीविषयक कायदे, त्यांच्या आर्थिक दर्जात सुधारणा, प्रसारमाध्यमांची भूमिका, स्वंयसेवी संस्थांचा सहभाग, स्त्रियांना केंद्रस्थानी मानून योजनांची निश्चिती, स्वंयसहाय्यता बचतगटांचाच विकास, मुद्रा योजना यांचा प्रामुख्याने विचार केला जातो. शासकीय–निमशासकीय यंत्रणामध्ये स्त्रियांना नोकरीत 30 टक्के आणि स्थानिक विकास महामंडळाच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या माध्यमातून स्त्रियांना शिक्षण–प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध होतात.[4]

**निश्कर्श:** ग्रामीण भारतात आर्थिक व सामाजिक विकासात महिला स्वयंसहाय्यता गचत गट अत्यंत प्रभावी भूमिका पार पाडत आहे. बचत गट म्हणजे केवळ पैशांची बचत करणे एवढेच बचत गटाचे उद्दिष्ट नसून; त्यांच्या हातांना काम मिळवून देणे आणि स्वमिळकतीतील आत्मसन्मान मिळवून देणे हे आहे. बचत गटांच्या स्थापनेमुळे बचतीच्या सवयीबरोबरच स्वयंरोजगार करण्याची प्रेरणा महिलांना मिळाली आहे. चूल आणि मूल इतकेच विश्व असणाऱ्या महिला आज बचत गटाच्या माध्यमातून बाह्य जगाच्या संपर्कात आलेल्या आहेत. बऱ्याचदा शिक्षण हे जेमतेम असून देखिल ग्रामीण स्त्री बचत गटामुळे तीच्यामध्ये आत्मबळ, आत्मसन्मान,

आणि प्राप्त परिस्थितीशी कसे वागावे हे तीला आता खूप चांगल्या प्रकारे कळू लागलेले आहे. ती एक नुसती साक्षर नसून तीच्यात अर्थसाक्षरता निर्माण झाली आहे. हे केवळ आणि केवळ बचत गटामुळे शक्य झाले आहे.

**संदर्भ:**


1. https://mr.m.wikipedia.org
2. मुलाणी एम.यू. (2008) *'महिला सवयंसहाय्यता बचत गट'*, पुणे: डायमंड पब्लिकेशन, पृ. 11.
3. लोकसत्ता, 2017 / 04 / 01(*मार्च 18, 2020*)
4. कित्ता, लोकसत्ता, 2017 / 04 / 01(*मार्च 18, 2020*)


❑❑❑